**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः06.10.2023** **वारः शुक्रवार**

---

**ठळक बातम्या,**

१.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला राज्यातल्या आरोग्य सुविधांचा आढावा,

२.महाबळेश्वर आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र म्हणून नावारूपाला यावं - केंद्रीय मंत्री किरेन रीजीजू यांची अपेक्षा,

३.विश्वकर्मा योजनेचा लाभ घेऊन उद्योजक व्हावं –केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचं कारागिरांना आवाहन

आणि

४.आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची काल तीन सुवर्ण पदकांची कमाई.

## आरोग्य आढावा

नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमण्यात आली असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. शिंदे यांनी काल राज्यातल्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधून राज्यातल्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातल्या शासकीय, महापालिका आणि नगरपालिका रुग्णालयांना, प्राथमिक आरोग्य केंद्रांना आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारीतल्या रुग्णालयांना तात्काळ भेट देऊन पाहणी करावी, आणि सद्यस्थितीचा अहवाल सादर करावा, असे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन आराखडा तयार करण्याचे काम राज्य सरकार करत असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## गुन्हा दाखल

नांदेड शासकीय रुग्णालयात मृत्यू झालेल्यांची संख्या आता 41 वर पोहोचली असून यात 22 बालकांचा समावेश आहे. या प्रकरणी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

आणि रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एस.आर. वाकोडे यांच्यासह बालरोग विभागातल्या डॉक्टरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वडेट्टीवार

विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी काल काँग्रेसच्या शिष्टमंडळासह राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेत त्यांना विविध मागण्यांचं निवेदन दिलं. राज्यातल्या शासकीय रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यूंसंदर्भात निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीची नेमणूक करावी आणि प्रत्येक मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत करावी, अशी मागणी त्यांनी केली. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, शासन सेवेतली पदं कंत्राटी स्वरुपात भरण्याचा शासन निर्णय यासह विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी विधीमंडळाचं दोन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलवावं, अशी विनंतीही वडेट्टीवार यांनी केली आहे.

## किरेन रिजीजू

आगामी काळात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ढगफुटी आणि भुकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना देणं शक्य होईल आणि त्यामुळे संभाव्य नुकसानही टाळता येईल, असा विश्वास केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्री कीरेन रीजीजू यांनी काल महाबळेश्वरमध्ये व्यक्त केला. त्यासाठी स्वदेशी बनावटीची डॉप्लर रडार यंत्रणा तयार केली जात असल्याचं ते म्हणाले. महाबळेश्वर इथल्या अति उंचावरील मेघ भौतिकशास्त्र प्रयोगशाळेला भेट देऊन पाहणी केल्यानंतर रीजीजू यांनी पत्रकारांशी संवाद साधला. हवामान क्षेत्रातील अत्याधुनिक संशोधनाचा आणि त्यातून दिल्या जाणाऱ्या अचूक अंदाजाचा फायदा देशभरातील शेतकरी आणि मच्छीमारांना होत असून गेल्या 9 वर्षात या क्षेत्रात भारताने दमदार कामगिरी केल्याचं ते म्हणाले. महाबळेश्वर आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र म्हणून नावारूपाला यावं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या या दौऱ्याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून

**महाबळेश्वर हे देशातील काही सर्वोत्तम पर्यटनस्थळांपैकी एक असून आता त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याची गरज असल्याचं केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं असून त्यादृष्टीनं प्रयत्न करण्याचा निर्धार देखील व्यक्त केला आहे. वेण्णा तलावाजवळच असलेल्या अति उंचावरील मेघ भौतिकशास्त्र प्रयोगशाळेला भेट देण्याच्या निमित्तानं रिजिजू दोन दिवसांच्या महाबळेश्वर दौऱ्यावर असून इथल्या निसर्ग सौंदर्याची प्रत्यक्ष अनुभूती घेतल्यानंतर त्यांनी हा मनोदय जाहीर केला. महाबळेश्वरमध्ये लवकरच**

**आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करणार असून त्यानिमित्तानं स्थानिकांना रोजगाराची नवीन संधी उपलब्ध होईल असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. महाबळेश्वरचे वैभव असलेल्या स्ट्राबेरीच्या गुणवत्तेत आणि उत्पादनात सुद्धा अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे वाढ करणे सहज शक्य असून त्यासाठी हवामान विभागानं स्थानिक प्रशासन आणि राज्य शासनाशी समन्वय ठेऊन काम करण्याच्या सूचना रिजिजू यांनी यावेळी दिल्या. एकंदरीतच रिजिजू यांचा हा दौरा हवामान विभागाबरोबरच महाबळेश्वरवासियांसाठी देखील चांगलाच फलदायी ठरणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी महाबळेश्वरहून विनायक सोमणी.**

## विश्वकर्मा

पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत असलेल्या पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा इच्छुकांनी फायदा घेऊन उद्योजक बनावं आणि आपली आर्थिक प्रगती साधावी, असं आवाहन केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांनी केलं आहे. काल सिंधुदुर्ग इथं या योजनेसंदर्भात परिसंवाद आणि जनजागृती कार्यक्रम झाला, त्यावेळी राणे बोलत होते. यावेळी राणे यांच्या हस्ते काही प्रातिनिधिक कारागिरांचा सत्कार करण्यात आला.

## निवडणूक आयोग

राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीसंदर्भात आज केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी होणार आहे. अजित पवार गटाने निवडणूक आयोगाकडे पक्षाचे निवडणूक चिन्ह मिळावे आणि अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता मिळावी, यासाठी अर्ज केला आहे. या दाव्याला शरद पवारांसोबत असलेल्या गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विरोध केला आहे.

## आयटी पार्क

कोल्हापूरचे वाढते शहरीकरण आणि लोकसंख्या पाहता तिथे आयटीपार्क होणं आवश्यक असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. यासाठी कृषी विद्यापीठाची रिकामी 30 हेक्टर जागा वापरावी आणि विद्यापीठाला पर्यायी 50 हेक्टर जागा उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना पवार यांनी काल केली. या संदर्भात मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय कंपन्यांना पुण्यानंतर कोल्हापूर हा एक चांगला पर्याय आहे, असंही पवार म्हणाले.

आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी कोल्हापूरातील मध्यवर्ती जागा निश्चित करावी असे निर्देशही अजित पवार यांनी अन्य एका बैठकीत दिले.

## महिलाआयोग

महिलांविषयक गुन्हेगारीला, तस्करीला आळा घालण्यासाठी राज्य महिला आयोगाचा बंधमुक्त भारतीय युवा अर्थात 'यंग इंडिया अनचेन्ड' हा उपक्रम मुंबईतल्या 30 महाविद्यालयांत सुरू होणार आहे, या उपक्रमाची महानगरपालिका, जिल्हा आणि तालुकास्तरावर व्याप्ती वाढवावी, असं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. या उपक्रमाच्या उद्घाटनानंतर त्या काल मुंबईत बोलत होत्या. गुन्हा घडल्यास तरुणांनी त्याबाबत आवाज उठवावा, असं आवाहन तटकरे यांनी केलं.

## पीक विमा

पंतप्रधान पीक विमा योजनेची कोविड काळातली देय नुकसान भरपाई आठ दिवसात शेतक-यांना नं दिल्यास पीक विमा कंपन्यांवर कारवाई करण्याचा इशारा कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला आहे. ते काल मुंबईत यासंदर्भातल्या आढावा बैठकीत बोलत होते. पंतप्रधान पीक विमा योजनेत सहभागी असलेल्या 6 कंपन्यांपैकी 4 कंपन्यांकडून दोनशे चोवीस कोटी रुपये येणे आहेत, अशी माहिती देत, कोविडसारख्या जागतिक आपत्तीमध्ये कंपन्यांनी सहकार्याची भूमिका ठेवली पाहिजे, असं मुंडे यांनी या विमा कंपन्यांना सांगितलं.

## चर्चासत्र

पुण्यात नव्यानं सुरू झालेल्या 'सेंटर फॉर पॉलिसी अँड गव्हर्नन्स' या संस्थेतर्फे 'मराठी भाषा: धोरण आणि अंमलबजावणी' या विषयावर येत्या रविवारी भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिरात एक चर्चासत्र आयोजित करण्यात आलं आहे. या चर्चासत्राचं उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते होणार आहे. मराठी भाषेबद्दलची शासनाची धोरणं आणि त्यांची अंमलबजावणी यावर या चर्चासत्रात भर देण्यात येईल असं संस्थेचे अध्यक्ष शशिकांत पाटील यांनी सांगितलं.

**निधन**

नवमहाराष्ट्र संघाचे उपाध्यक्ष तसंच पुणे जिल्हा खो खो संघटनेचे अध्यक्ष महेश मेढेकर यांचं काल पुण्यात दीर्घ आजारानं निधन झालं. ते 70 वर्षांचे होते. आज सकाळी वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**निधन**

जळगांव इथले  कामगार नेते आणि माजी नगरसेवक विजय पंडितराव कोल्हे यांचं काल अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर  आज दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

बुडून मृत्यू

अहमदनगर जिल्ह्यातील खर्डा इथं काल तीन शाळकरी मुलांचा तलावात बुडून मृत्यू झाला. हे तीन भावंड आपल्या आई-वडिलांना कपडे धुवायला मदत करण्यासाठी तलावावर गेले होते. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातही तळ्यावर कपडे धुण्यासाठी गेलेल्या दोन भावंडांचा काल पाण्यात बुडून मृत्यू झाला.

क्रिकेट

विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील सलामीच्या सामन्यात न्यूझीलंडनं इंग्लंडवर 9 गडी राखून मात केली. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट मैदानावर झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडनं दिलेलं 283 धावांचं लक्ष्य न्यूझीलंडने 37 व्या षटकातच पूर्ण केलं.

क्रीडा

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमधे काल तिरंदाजीच्या सांघिक प्रकारात भारताच्या  ओजस देवतळे, प्रथमेश जावकर आणि अभिषेक शर्मा यांच्या चमूनं कोरियाच्या संघाचा 235 विरुद्ध 230 असा पराभव करुन सुवर्णपदक मिळवलं. ज्योती सुरेखा वेण्णम, प्रणित

कौर आणि अदिती गोपीचंद यांच्या महिला संघानेही तिरंदाजीत सुवर्णपदक मिळवलं.  स्क्वॅशमधे मिश्रगटात दीपिका पल्लिकल आणि हरिंदर संधू यांच्या जोडीने मलेशियाच्या जोडीचा 2-0 असा पराभव करुन सुवर्णपदकाला गवसणी घातली. या स्पर्धेमध्ये आतापर्यंत 21 सुवर्ण, 32 रौप्य आणि 33 कास्य पदकांसह 86 पदकं जिंकून भारत पदक तालिकेत चौथ्या स्थानावर आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

**हवामान**

येत्या 24तासात कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून राज्याच्या उर्वरित भागात हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार..**